माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

# माधवप्रिया
आयुर्वेदिक क्लिनिक व पंचकर्म केंद्र

डॉ. संतोष रावसाहेब देशमुख
एम. डी. आयुर्वेद, मुंबई

## उंचीवाढीसाठी माहितीपत्रक (अँडवान्स कोर्स)

सध्याच्या आधुनिक व स्पर्धात्मक युगात चांगली ऊंची असणे चांगल्या व्यक्तिमत्वाचे लक्षण आहे. या ऍडव्हान्स कोर्स मधील दिली जाणारी औषधे पूर्णतः निर्धोक दुष्परिणाम रहित आयुर्वेदीय व अनुभवी वैद्याद्धारे सिद्ध आहेत.

हा औषधी कोर्स ३ महिन्यांमध्ये विभागला आहे. तपासणीसाठी बालकासह पालकांनी येणे आवश्यक आहे.प्रथम १ महिन्याचे औषध दिले जाते, औषधे देण्यापूर्वी अनुभवी वैद्य रुग्णास तपासतात व उंची सेंटीमीटर मध्ये मोजून नोंद करतात.

तारीख स्वतःची उंची सर्व परिस्थिती (तोच टेप, तीच पट्टी व तीच जागा , तीच मोजणरी व्यक्ती) कायम ठेवून मोजून ठेवावी, भिंतीवर फक्त खूण करु नये. उंची रुग्णाने घरी तारीख, वार, वेळ सहित मोजून डायरीत नोंद ठेवावी. उंची फक्त सेंटीमीटर मध्ये मोजावी. शास्त्रीय दृष्ट्या सकाळची उंची संध्याकाळच्या उंचीपेक्षा साधारण एक ते सव्वा सेंटिमीटर जास्त भरते,

हे औषध चालू असताना ऍलोपॅथिक,होमिओपॅथिक औषधे इतर आजारांसाठी घेतल्यास चालतात. आवश्यकता वाटल्यास आयुर्वेदिक औषधे घेता येतील.

**विशेष नोंद :**
**सहा ते अठरा** वयोगटामध्ये या औषधाचा **९५%** सुपरिणाम आहे. फक्त ५ % लोकांची उंची वाढत नाही.

**१८ ते २१** वयोगटामध्ये या औषधाचा **७०%** सुपरिणाम आहे. परंतु उंची न वाढण्याचे प्रमाणही ३०% आहे, आशा लोकांना एक वेळ औषध देऊन फायदा झाल्यासच पुढे औषध दिले जाते, अन्यथा पुन्हा दिले जात नाही.

## पहिल्या महिन्यातील औषधे

१) पुडी / गोळी नं. १
२) पुडी/ गोळी नं २
३) १ थेंब उजव्या नाकपुडीत टाकावयाचे औषध

**औषध कसे घ्यावे ?**

१) पुडी/गोळी नं १ रोज सकाळी सात वाजण्याच्या आत घ्यावे.औषध मोकळ्या पोटी घ्यावे व औषध घेण्यापूर्वी शुचिर्भूत व्हावे.
२) पुडी/गोळी नं २ रोज रात्री झोपण्यापूर्वी दुधा सह घ्यावी.
३) नाकात टाकण्याचे औषध रोज रात्री झोपण्यापूर्वी उजव्या नाकपुडीत १ थेंब झोपून सोडावे व दहा मिनिटे तसेच पडून रहावे.५० दिवस पुरते तो पर्यंत हेच वापरावे.
४)एक किलो अहळीव / हलीम हे लाल रंगाचे बारीक धान्य साफ करून त्याचे 30 सम भाग करावेत. (अहळीव पाण्यात भिजवून स्वच्छ करू नये.)

५) 30 दिवस रोज सकाळी ७ च्या पूर्वी १ भाग अहळीव, पुडी/गोळी नं.१ व आवडीनुसार साखर, शतावरी कल्प, कॉम्प्लेन हे मिश्रण एका वाटीत घ्यावे व थोडं थोडं तोंडात टाकून न चावता गाईच्या दुधासोबत गिळावे.

६)दूध गाईचेच असावे. पहिल्या दिवशी एकूण १/२ लिटर दुध प्यावे व नंतर प्रमाण हळूहळू वाढवावे जास्तीत जास्त दुधाचा भाग सकाळी औषधा सोबत घ्यावा व उरलेले दूध दिवसभरात संपवावे. महिन्याच्या अखेरपर्यंत २ ते २.५ लिटर दूध गेल्यास अधिक फायदा दिसतो.

७)व्यायाम – पुलप्स, दोरीवरच्या उडया , पद्मासन, सर्वांगासन, ताडासन, पश्चिमोतानासन यांचाही उंची वाढवण्यासाठी फायदा करून घ्यावा, सर्व व्यायाम जास्तीत जास्त १५ मिनिटे करावा. स्त्रियांनी मासिक पाळीच्या वेळी व्यायाम करू नये पण औषध खावे.

८)लहान मुलांना (७ ते १३ वर्षांपर्यंत) प्रकृती व बलानुसार दूध व अहळीवाचे प्रमाण कमी करता येते. ते प्रत्यक्ष औषध घेताना सांगितले जाते. अहळीव, गूळ, ओले खोबरे यांचा लाडू व त्याच बरोबर पुड्या/गोळ्या अशी औषध घेण्याची पद्धत १३ वर्षांपर्यंत चालू शकते.

## दुसऱ्या महिन्याच्या औषधाच्या सूचना

रुग्णांनी एक महिना पूर्ण झाल्यावर पुन्हा तपासणीसाठी आल्यावर उंची मोजली जाते.

१) एक - एक चमचा अहळीव सकाळ - संध्याकाळ ग्लासभर दुधा सोबत घ्यावी.

२) दोन्ही जेवणात मध्यम आकाराचा कांदा व एक छोटा गुळाचा खडा.

3) व्यायाम-पूर्ववत

४) दिलेली औषधी घेणे.

## तिसऱ्या महिन्याच्या औषधाच्या सूचना

पुनः उंची मोजली जाते.

१) एक-एक चमचा अहळीव सकाळ व संध्याकाळी ग्लासभर दुधा सोबत

२) दोन्ही जेवणात एक काकडी चतकोर लिंबू सेवन करावे.

३) व्यायाम-पूर्ववत.

४) दिलेली औषधे घेणे.

**पथ्य:**

१) दूध शक्यतो गाईचेच असावे कारण ते पचनास सुलभ असते. दूध अधिकाधिक प्यावे.

२) दोन्ही वेळ व्यवस्थित जेवण करता येते. परंतु तिखट, तेलकट, आंबट, मसालेदार, चमचमीत, वातूळ हे पदार्थ खाऊ नयेत.

३) उपवासाला हे औषध चालते.

४) औषध सुरु असताना काही जणांना एक-दोन जुलाब होतात.त्यातून अशक्तपणा येत नाही, जुलाब होणे चांगले लक्षण आहे.
५) या औषधाने वजन वाढत नाही. म्हशीचे दूध वापरल्यास जाडी वाढते (स्थूल लोकांनी गाईचे दूध प्यावे)
६. अहळीव चावून खाऊ नये; ते दुधा सोबत गिळावे.

सांगितलेल्या प्रमाणात दूध घेणे, पथ्य पाळणे, औषध आणि व्यायाम खंड न पड़ता करणे, या गोष्टी घडल्या तरच उंची वाढते.या पैकी एकही गोष्टीत हलगर्जीपणा चालत नाही,

या औषधाचा उपयोग व्यक्तिमत्व विकासासाठी, निरनिराळ्या परीक्षांच्या पात्रतेसाठी व ज्यांचे आईवडील उंचीने कमी आहेत, या बरोबर न्यूनगंडाची भावना दूर होण्यासाठी चांगला होतो.

एका वेळी औषध घेतल्याने पाव सेंटीमीटर पासून ३ ईंचा पर्यंत उंची वाढले असा अनुभव आहे. हा औषध परिणाम फक्त हाडावरच घडतो असे नसून सर्व शरीर घटकांवर सर्वत्र समान परिणाम घडतो.


अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

| क्र. | माधवप्रिया शाखा | संपर्क | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - प्रमुख शाखा | 7045607187 | |
| २ | कांदिवली | 7304751357 | |
| ३ | गिरगाव | 022-22081081 | |
| ४ | पुणे - तिसरा रविवार | 8169507436 | |
| ५ | कोल्हापूर - पहिला रविवार | 7045607187 | |